# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 3607 /शि.वि./2017
दि. 23/01/2017

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :– दि.25 जानेवारी 2017 रोजी 'राष्ट्रीय मतदार दिवस' साजरा करण्याबाबत.**

संदर्भ :– मा.अति.आयुक्त–3, म.न.पा. यांचे पत्र क्र.सा.प्र.वि./48/परि दि.19.01.2017.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, 25 जानेवारी 2017 रोजी **'राष्ट्रीय मतदार दिवस'** साजरा करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने 18 वर्ष पूर्ण केलेल्या नवीन तरूण मतदारांचा मतदार यादीत समावेश करणे व त्यांच्या मतदान प्रक्रीयेत सहभाग वाढविणे हा प्रमुख उद्देश आहे. या राष्ट्रीय मतदार दिवसाच्या अनुषंगाने शासनाच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या लोकशाही प्रक्रीयेमधील सहभाग वाढावा या हेतूने दि.25 जानेवारी 2017 या राष्ट्रीय मतदार दिनी सकाळी 11.00 वाजता छत्रपती शिवाजी महाराज, नविन प्रशासकीय ईमारतीतील तळमजल्यावरील लॉबीमध्ये मतदारासाठीची शपथ घेण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.

यानुसार आपल्या शाळेतसुध्दा शालेय परीपाठाच्या वेळेस सोबत जोडलेली राष्ट्रीय मतदार दिवस शपथ घ्यावी व याचा कार्यपालन अहवाल कार्यालयास सादर करावा.

**राष्ट्रीय मतदार दिवस मतदारांनी घ्यावयाची शपथ**

"आम्ही, भारताचे नागरीक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याव्दारे, प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू, आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा, यांच्या विचाराच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू."

टिप :– **पल्स पोलिओ मोहिम – प्रथम फेरी दि.29 जानेवारी 2017(रविवार) व व्दितीय फेरी 02 फेब्रूवारी 2017 (रविवार) ला होणार आहे. याकरीता ही तारीख सूचनाफलकावर ठळक अक्षरांत लिहून उपरोक्त दिनी संपूर्ण व्यवस्थेसह शाळा सुरू ठेवावी.**

(फारूक अहमद खान)
शिक्षणाधिकारी,
महानगरपालिका, नागपूर